| MHSO140009712016 | दाखल दिनांकः | २०/०९/२०१२ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांकः | २०/०९/२०१२ |
| | निकाल दिनांकः | २५/०६/२०२६ |
| | कालावधीः | व. म. दि.<br>१३ ०९ ०५ |

**निशाणी क्र.१९**

# भाग 'अ'

| बार्शी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कोर्ट नं.१ यांचे न्यायालयात<br>( पिठासीन अधिकारी श्रीमती पी.व्ही. राऊत ) | | |
|---|---|---|
| केस नंबर | :- | **संक्षिप्त फौज. खटला क्र. ४१७७/२०१२** |
| अपराध क्रमांक व पोलीस स्टेशन | :- | गु.र.नं.१३२/२०१२<br>वैराग पोलीस स्टेशन, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर. |
| **फिर्यादी** | :- | **महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>वैरागे पोलीस स्टेशन, बार्शी,<br>ता.बार्शी जि.सोलापूर.** |
| **फिर्यादीतर्फे वकील** | :- | **श्री. आर. बी. काजळे, सहाय्यक सरकारी वकील** |
| **आरोपी** | :- | **कल्याण गोरख पाडुळे,**<br>वयः- ४९ वर्षे, धंदाः-ड्रायव्हर,<br>रा. घाणेगाव, ता.बार्शी जि.सोलापूर. |
| **आरोपीतर्फे वकील** | :- | श्री. एम.ए जगताप. |

# भाग 'ब'

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | ०९/०४/२०१२ |
| प्रथम खबर दिल्याची तारीख | १७/०८/२०१२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | २०/०९/२०१२ |
| आरोपींचे प्रतिकथन/निवेदन नोंदविल्याची तारीख | ०२/०४/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | १९/०९/२०२५ |
| खटला न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | २३/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २५/०६/२०२६ |
| शिक्षेचा आदेश असल्यास, | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला शिक्षा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेल्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **कल्याण गोरख पाडुळे,** | १४/०५/२०१२ | १४/०५/२०१२ | भा.द.वि. कलम ३०४(अ), २८३ व ४२७ आणि मोटार वाहन कायदयाचे कलम १३४/१७७ अन्वये | आरोपीची निर्दोष मुक्ताता झाली. | -- | -- |

## भाग 'क'

## सरकारी साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/ न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

**अः- सरकारी साक्षीदारः-**

| दर्जा | साक्षीदाराचे नाव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | राहुल वसंत कुलकर्णी (नि.क्र.१०) | साक्षीदार |
| सा.क्र.२ | भरतीर विठ्ठलराव कुलकर्णी(नि.क्र.११) | साक्षीदार |
| सा.क्र.३ | प्रदिप दादाराव सातपुते (नि.क्र.१२) | पंच साक्षीदार |
| सा.क्र.४ | हरीश सुधाकर देशपांडे (नि.क्र.१८) | साक्षीदार |
| सा.क्र.५ | संदिप सुरेश कुलकर्णी (नि.क्र.१९) | साक्षीदार |
| सा.क्र.६ | अनिल सुर्यभान गोडसे (नि.क्र.२१) | फिर्यादी/तपासी अंमलदार |

**ब- बचाव पक्षाचे साक्षीदार :- नाही**

**क- न्यायालयातर्फे साक्षीदार :- नाही**

## सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी.

**अ. सरकार पक्षातर्फेः-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०८ | आरोपीचे प्रतिकथन(प्ली) |
| २. | निशाणी क्र.२२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | निशाणी क्र.२३ | गाडीचा पंचनामा |
| ४. | निशाणी क्र. २४ | फिर्याद |
| ४. | निशाणी क्र.२५ | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये नोंदविलेला आरोपीचा जबाब |

**ब. बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**ड. जप्त वस्तुंचे वर्णनः-**

| अ.क्र. | वस्तुंचा नंबर | वस्तुंचे वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

**(निकाल दिनांक २५ जुन, २०२६ रोजी घोषित.)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३०४(अ), २८३ ४२७ आणि मोटार वाहन कायदयाचे कलम १३४/१७७ अन्वये सदरचे प्रकरण चालविले आहे.

**०२]** **अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे की** :-

पोलीस नाईक अनिल सुर्यकांत गोडसे, ब.नं.३०५, यांनी घटनेबाबत फिर्यादी दिली आहे की, दिनांक २०/०४/२०१२ रोजी पोलीस ठाणे अंमलदार, पो.ना डि.बी. शेटे, ब.नं.१३३३ यांनी सोलापूर तालुका पोलीस ठाणे अपघात मयत नं.०/१२ फौ.प्र.सं कलम १७४ मध्ये मयत नामे नानासाहेब वसंत कुलकर्णी प्रमाणे दाखल होवून आलेली कागदापत्रे अपघात मयत नं.२३/१२ फौ.प्र.सं कलम १७४ प्रमाणे दाखल करुन मयताचा पुढील तपास त्यांच्याकडे दिला. त्यांनी त्यांना प्राप्त झालेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यानंतर दिंनाक २१/०४/२०१२ रोजी फिर्यादी तुळजापूर ते बार्शी रोडवर

जामगांव शिवारातील नागनाथ अभिमान सातपुते यांच्या शेताजवळ जावून साक्षीदार नामे कल्याण गोरख पाडूळे याने मयताची व झालेल्या अपघाताची हकीकत सांगितल्याने तसा त्याचा जबाब घेवून दोन पंचांसमक्ष सविस्तर घटनास्थळ पंचनामा केला. सदरचे ठिकाण बार्शी-तुळजापूर रोडवर जामगांव, ता.बार्शी शिवार आहे. दिनांक ०९/०४/२०१२ यातील ट्रॅक्टर ड्रायव्हर कल्याण गोरख पाडुळे हा ट्रॅक्टर क्रमांक एमएच-१३-एजे-६१६६ ला दोन ट्रॉल्या जोडून उस वाहतूक करण्याचे काम करतो. सदरचे काम जामगांव शिवारात चालू होते. संभाजी महादेव ठोंगे यांच्या शेतातील तोडलेला उस ट्रॉली क्र. एमएच-१३-टी-७२२९ मध्ये भरुन दिनांक ०९/०४/२०१२ रोजी सकाळी १०:०० वाजता तुळजापूर-बार्शी रोडवर नागनाथ अभिमान सातपुते यांच्या शेताजवळ रोडवर लावलेला होता. यातील मयत मोटारसायकल स्वार नानासाहेब वसंत कुलकर्णी हे मोटरसायकल क्र. एमएच-१२-बीडब्ल्यु-७५५० वरुन तुळजापूर रोडने बार्शीकडे जात असताना रोडचे रहदारीमुळे ट्रॉलीस पाठीमागून धडक बसल्याने तो गंभीर जखमी झाला व मोटारसायकलचे नुकसान झाले. त्यास उपचारासाठी त्याचे नातेवाईक हरिष सुधाकर देशपांडे व भरतरी विठ्ठल कुलकर्णी यांनी प्रथम जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल केले व पुढील उपचाराकरीता गंगा हॉस्पिटल, सोलापूर येथे दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार चालु असताना, तो दिनांक १२/०४/२०१२ रोजी रात्री १२:४५ वाजताच्या सुमारास मयत झाला आहे. यातील मयताचे नातेवाईक राहूल वसंत कुलकर्णी, वसंत सदाशिव कुलकर्णी, सौ विभा वसंत कुलकर्णी यांच्याकडे सदर मयताबाबत तपास केला असून ते वरील प्रमाणे हकीकत सांगत असल्याने त्यांचे टिपणे कागदपत्रांमध्ये सामील केले. अपघातातील मयतास त्याचे हनवटी व मानेला मार लावून ते जखमी झाले होते.

**०३]** सदर मयताचे करण्यात आलेल्या एकंदरीत तपासावरुन यातील ट्रॅक्टर ड्रायव्हर नामे कल्याण गोरख पाडुळे याने उसाने भरलेली ट्रॉली क्र.

एमएच-१३-टी-७२२९ ही दिनांक ०९/०४/२०१२ रोजी सकाळी १०:०० वाजताच्या सुमारास तुळजापूर-बार्शी रोडवर जामगांव शिवारातील नागनाथ अभिमान सातपुते यांच्या शेताजवळ रोडवर रहदारीस अडथळा होईल, जिवतास व मालमत्तेस नुकसान होईल अशा स्थितीमध्ये लावल्याने यातील मयत मोटारसायकल स्वार नामे नानासाहेब वसंत कुलकर्णी यांचे कावासाकी मोटारसायकल.क्र. एमएच-१२-बीडब्ल्यु-७५५० वरुन जात असताना रहदारीस अडथळा झाल्याने अपघात होवून त्यामध्ये गंभीर जखमी झाल्याने उपचार चालु असताना तो दिनांक १२/०४/२०१२ रोजी मयत झालेला आहे. तरी यातील ट्रॅक्टर ड्रायव्हर याने उसाने भरलेली ट्रॉली रोडवर रहदारीस अडथळा होईल अशी लावल्याने मयताच्या मृत्यूस कारणीभूत होवून अपघाताची खबर दिली नाही. म्हणून फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद आरोपीविरुध्द भा.द.वि कलम ३०४-अ, २८३, ४२७ मोटार वाहन कायदा १३४/१७७ प्रमाणे दिली आहे.

**०४]** गुन्हयाची नोंद झाल्यानंतर तपासी अधिकारी पो.ना.३०५ श्री.ए. एस. गोडसे, वैराग पोलीस स्टेशन यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, शवविच्छेदन अहवाल, मरणोत्तर पंचनामा, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास पुर्ण झाल्यानंतर फिर्याद नोंदविली, वैराग पोलीस स्टेशन यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०५]** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र.०८ वर आरोपीचे प्रतिकथन नोंदवुन आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३०४(अ), २८३ व ४२७ आणि मोटार वाहन कायदयाचे कलम १३४/१७७ अन्वये दोषारोप ठेवले, ते त्यांना वाचुन व समजावुन सांगितले ते त्यांनी नाकबुल करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यात आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्र.२५ वर नोंदविण्यात

आले. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या विरुध्दची सर्व कथने नाकारुन खोटी साक्ष दिले असल्याचे कथन केले आहे.

**०६]** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये घटनेबाबत अभिलेखावर तपासण्यात आलेले साक्षीदार सुसंगत पुरावा देत आहे. तपासी अंमलदार यांच्या पुराव्यातून घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला आहे. अभिलेखावर दाखल कागदपत्रांवरुन अपघातामध्ये नानासाहेब वसंत कुलकर्णी हे मयत झालेले आहेत व त्यांच्या मृत्यूस आरोपी कारणाभूत असल्याबाबतचा पुरावा आलेला आहे. सबब, आरोपीस शिक्षा करण्याबाबत सहाय्यक सरकारी वकील यांनी विनंती केली आहे. उलटपक्षी आरोपीच्या विधीज्ञांच्या युक्तीवादानुसार अभिलेखावर तपासण्यात आलेल्या साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नाही. घटनास्थळ पंचनामा पंच साक्षीदाराच्या पुराव्यातून सिध्द झालेला नाही. आरोपी घटनेच्यावेळी घटनास्थळावर उपस्थित होता व त्याने अपघातातील वाहन रस्त्याच्या परिस्थितीला अडथळा निर्माण होईल असे लावले होते याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. सबब, आरोपीस प्रस्तुतच्या गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

**०७]** खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले व त्यावर मी खालील प्रमाणे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०९/०४/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास मौजे जामगांव, ता.बार्शी येथील तुळजापूर-बार्शी रोडवर नागनाथ सातपुते यांच्या शेताजवळ आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॉली क्र. एमएच-१३-टी-७२२९ ही निष्काळजीपणे रस्त्याच्या रहदारीस अडथळा निर्माण होईल अशी लावल्यामुळे | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | मोटारसायकल क्र. एमएच-१२-बीडब्यू-७५२० वरुन स्वार मयत नानासाहेब वसंत कुलकर्णी यांनी आरोपीच्या ट्रॉलीस पाठीमागून धडक दिले व आरोपी त्यांचे मृत्यूस कारणीभूत ठरले व त्यानुसार भारतीय दंड विधानाचे कलम ३०४(अ) प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| २. | वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॉली क्र.एमएच-१३-टी-७२२९ ही निष्काळजीपणाने रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होईल अशी लावली व नानासाहेब वसंत कुलकर्णी यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरले त्यानुसार भारतीय दंड विधानाचे कलम २८३ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| ३. | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॉली ही रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होईल अशी लावल्यामुळे मयत नानासाहेब वसंत कुलकर्णी यांच्या मोटारसायकलचे रक्कम रु.३०००/- इतके नुकसान करुन आगळीक केली व त्याद्वारे भारतीय दंड संहितेचे कलम ४२७ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले का? | नकारार्थी |
| ४. | वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी, आरोपी हा सदर अपघातातील जखमीस उपचाराकरीता दवाखान्यात दाखल न करता व अपघाताबाबत पोलीस ठाण्यात खबर न देता निघुन गेला व त्यानुसार मोटार वाहन कायदयाचे कलम १३४ सहकलम १७७ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नकारार्थी |
| ५. | काय हुकूम व आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

**०८]** आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने उपरोक्त नमुद भाग 'क' प्रमाणे एकुण सहा साक्षीदार तपासले.

**०९]** अभियोग पक्षाच्या कथनानुसार दिनांक ०९/०४/२०१२ रोजी सकाळी १०:०० वाजताच्या सुमारास मौजे जामगांव ता.बार्शी शिवारात नागनाथ अभिमान सातपुते यांच्या शेताजवळ आरोपी याने त्याच्या ताब्यातील उसाने भरलेली ट्रॉली क्र. एमएच-१३-टी-७२२९ ही रहदारीस अडथळा निर्माण होईल तसेच जिवीतास व मालमत्तेस नुकसान होईल अशा स्थितीमध्ये लावले. त्यामुळे अपघातील मयत नानासाहेब वसंत कुलकर्णी हे मोटारसायकल क्र. एमएच-१२-बीडब्ल्यु-७५५० वरुन तुळजापूर वरुन बार्शीकडे जात असताना त्यांची मोटारसायकल ट्रॉलीचे पाठीमागे धडक दिल्याने व ते ट्रॉलीतील उस लागून जखमी झाले. त्यामुळे आरोपी हा मयताच्या मृत्यूस कारणाभूत झाला आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबतः-</u>**

**१०]** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभिलेखावर साक्षीदार क्र.१ राहूल वसंत कुलकर्णी यांचा पुरावा नोंदविला. प्रस्तुतचे साक्षीदार हे मयत नानासाहेब यांचे भाउ आहेत. साक्षीदार यांच्या पुराव्यानुसार सन २०१२ ते त्यांचे आई, वडील व भाउ यांचेसह राहत होते. त्यांचे भावाचे नाव नानासाहेब वसंत कुलकर्णी असे आहे. सन २०१२ साली ते पुणे-चाकन येथे कंपनीमध्ये काम करीत होते. दिनांक ०९/०४/२०१२ रोजी अपघात झाला होता. अपघात हा सकाळी १०:०० ते १०:३० वाजताच्यादरम्यान झाला होता. सदरील अपघात हा ट्रॉली आणि

मोटारसायकलचा झाला होता. त्यांच्या भावाचा अपघात झाला होता व त्यांना अपघाताबाबत फोन आला होता. त्यांच्या भावाला दवाखान्यामध्ये आणलेले असल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर ते ५:३० वाजताच्या सुमारास जगदाळे मामा हॉस्पिटल येथे गेले. त्यांच्या भावाच्या तोंडाला आणि मानेला मार लागला होता. तेथे त्यांच्या उपचार चालु होते. परंतु डॉक्टरांनी त्यांच्या भावाला सोलापूर येथे घेवून जाण्यास सांगितले त्यामुळे त्यांनी त्यांच्या भावाला गंगा हॉस्पिटल येथे घेवून गेले. उपचारादरम्यान दिनांक १२/०४/२०१२ रोजी त्यांच्या भावाचा मृत्यू झाला. अपघातातील भावाच्या गाडीचा क्र. एमएच-१३-बीडब्ल्यु-७५५० असा होता. ट्रॉलीचा क्र. एमएच-१३-टी-२९७२ असा होता. ट्रॉली कोण चालवत होते, हे त्यांना कळाले नाही. अपघात हा ट्रॅक्टर ट्रॉलीच्या चुकीमुळे झाल्याचे त्यांना कळाले. सहाय्यक सरकारी वकील यांनी प्रस्तुतचे साक्षीदार हे आरोपीच्या ओळखीबाबत सहकार्य करीत नसल्याने त्यांनी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले असता, साक्षीदाराने पोलीसांनी त्यांना आरोपीचे नाव कल्याण गोरख पाडुळे असे सांगितल्याचे अमान्य केले आहे. तसेच ते आरोपीला बघितल्यास ओळखू शकत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. आरोपी यांच्या विधीज्ञांनी साक्षीदाराचा उटलतपास नोंदविला असता, त्यांनी घटना प्रत्यक्ष बघितलेली नसून त्यांच्या नातेवाईकांनी व भावाने सांगिलेल्या माहितीनुसार त्यांना घटनाबाबत माहिती झाले आहे.

**११]** अपघात झाल्यानंतर साक्षीदार क्र.२ भरतरी विठ्ठल कुलकर्णी व साक्षीदार क्र.४ हरीष सुधाकर देशपांडे यांनी अपघातातील जखमी यांना उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटल दाखल केलेले आहे. सबब, वरील दोन्ही साक्षीदारांचा पुरावा महत्वाचा आहे. साक्षीदार क्र.२ भरतरी कुलकर्णी यांच्या पुराव्यानुसार दिनांक ०९/०४/२०१२ रोजी त्यांना उपळेदुमला येथे प्रकाश कुलकर्णी यांचा सकाळी १०:३० वाजता फोन आला. उपळेदुमाला आणि

जामगांवच्या शिवारामध्ये उसाने भरलेल्या ट्रॉलीने पाठीमागून नानासाहेब वसंत कुलकर्णी हा धडकलेला आहे व तो जखमी झालेला आहे असे त्यांना कळाले. त्याप्रमाणे त्यांनी जखमी यांच्या भावाला फोन केला. त्यानंतर ते संदीप कुलकर्णी आणि हरीष देशपांडे यांच्यासोबत खाजगी गाडीने अपघाताच्या ठिकाणी गेले. त्याठिकाणी नानासाहेब यास शरीरावर जखमा झालेल्या दिसल्या, त्याला गाडीमध्ये घेवून जगदाळे मामा हॉस्पिटल येथे दाखल केले. त्यानंतर दिनांक १०/०४/२०१२ ला गंगा हॉस्पिटल येथे घेवून गेले. नंतर दिनांक १२/०४/२०१२ रोजी १२:४० वाजताच्या सुमारास उपचारादरम्यान नानासाहेब मरण पावले.

**१२]** अपघातामध्ये जखमीच्या गाडीचा क्र.एमएच-१२-बीडब्ल्यु-७५५० असा होता. तसेच ट्रॉलीचा क्र. एमएच-१३-टी-७२२९ असा होता. ट्रॉलीने रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण केला म्हणून ट्रॉलीच्या चुकीमुळे अपघात झाला होता. ट्रॉलीचा चालक कल्याण पाडुळे असल्याचे त्यांना नंतर कळाले. साक्षीदाराने न्यायालयात हजर आरोपीला ओळखले आहे. आरोपीच्या विधीज्ञांनी साक्षीदाराचा उलटतपास नोंदविला असता, साक्षीदाराने घटनेच्यावेळी ते व इतर साक्षीदार स्वतः हजर नव्हते व घटनेबाबत नातेवाईकांकडून कळालेले आहे. तसेच गाडीचा क्रमांक व चालकाचे नाव त्यांना नातेवाईकांकडून कळाले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. मयत हे त्यांचे भाउ असल्याचे ही त्यांचे कथन आहे. तसेच त्यांचा भाउ रस्त्याला थांबलेल्या गाडीला पाठीमागून जावून धडकल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१३]** साक्षीदार क्र.४ हरीष सुधाकर देशपांडे यांच्या पुराव्यानुसार मयत नानासाहेब हे त्यांचे मेहुणे आहेत. दिनांक ०९/०४/२०१२ रोजी ते तुळजापूर वरुन येत होते, तेथे वाहतुकीस अडथळा होईल अशाप्रकार ट्रॅक्टर लावलेला

होता. ट्रॅक्टरवरती त्यांचा अपघात झाले. नानासाहेब हे दुचाकीवर होते. अपघात झाल्यानंतर त्यांना जगदाळे मामा हॉस्पिटल येथे दाखल केले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना गंगा हॉस्पिटल, सोलापूर येथे दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान ते मयत झाले. ट्रॅक्टर ट्रॉलीचा क्र. एमएच-१३-टी-७२२९ असा होता व त्यांच्या मेहुण्याच्या गाडीचा क्र. एमएच-१२-बी-७५५० असा होता. सदरील ट्रॅक्टर कोणी लावला याची त्यांना माहिती नाही. ट्रॅक्टर मालकाने रस्त्यात ट्रॉली उभी करुन अचडण निर्माण केल्याने अपघात झाला होता. आरोपीचे नाव कल्याण पाडुळे असे होते. त्यांनी आरोपीला पाहिलेले नाही. उलटतपासादरम्यान साक्षीदाराने घटना प्रत्यक्षदर्शी पाहिलेली नाही व घटनेची माहिती त्यांना नातेवाईकांकडून कळाली. तसेच गाडीचा क्रमांक ही त्यांना नातेवाईकांकडून कळाल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१४]** साक्षीदार क्र.५ संदीप सुरेश कुलकर्णी यांच्या पुराव्यानुसार दिनांक ०९/०४/२०१२ रोजी भरतरी यांचा त्यांना १२:३० वाजता फोन आला होता. त्यांनी सांगितले की, नानासाहेब कुलकर्णी यांचा अपघात झाला आहे. त्यानंतर ते, भरतरी आणि हरीष कुलकर्णी खाजगी वाहनाने उपळेदुमाला येथे गेले. तिथे गेल्यानंतर त्यांनी पाहिले की, नानासाहेब यास उसाच्या ट्रॉलीने धडक दिली होती आणि त्यांच्या हनवटीला, गळ्याला उसा लागून जखमा झाल्या होत्या. तेथून त्यांनी जखमी यांना जगदाळे मामा हॉस्पिटल येथे दाखल केले. त्यानंतर त्यांना दिनांक १० रोजी गंगामाई हॉस्पिटल, सोलापूर येथे नेले. दिनांक १२/०४/२०१२ रोजी नानासाहेब यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे शवविच्छेदन केले आणि त्यादिवशी संध्याकाळी त्यांच्या अंत्यसंस्कार केले. अपघाताच्या ठिकाणी ट्रॅक्टर मध्यभागी उभा होता आणि त्याच्या ट्रॉलीमध्ये उसा होता. नानासाहेब यास धडक मागून बसलेली होती. अपघात हा ट्रॅक्टरच्या चुकीमुळे झाला होता.

सदरील ट्रॅक्टर कोण चालवित होते हे त्यांना कळाले नाही. उलटतसादरम्यान साक्षीदाराने घटना त्यांच्यासमोर प्रत्यक्ष घडलेली नाही, घटना ज्याठिकाणी घडली तो रस्ता रहदारीचा आहे हे मान्य केले आहे. तसेच घटनास्थळावरील गाडीचा क्रमांक त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

**१५]** साक्षीदार क्र.३ प्रदीप दादाराव सातपुते हे घटनास्थळ पंचनाम्याचे पंच साक्षीदार आहेत. त्यांच्या पुराव्यानुसार दिनांक २१/०४/२०१२ रोजी पोलीस नाईक गोडसे यांनी त्यांना बोलविले होते. त्यांना घटनास्थळी बोलाविले नव्हते. त्यांनी कागदावर सही केली, परंतु पंचनामा त्यांच्यासमक्ष केल्याची बाब त्यांनी अमान्य केली. सहाय्यक सरकारी वकील यांनी साक्षीदाराचा उलटतपास नोंदविला असता, घटनास्थळ हे तुळजापूर ते बार्शी जाणा-या रोडवर उपळेदुमाला शिवेच्याजवळ असून त्याठिकाणी रोडच्या डाव्या बाजूला उसाने भरलेला ट्रॉली क्र. एमएच-१३-टी-७२२९ हे लावलेली होती व त्याठिकाणी धनाजी हजर होते याबाबी साक्षीदाराने अमान्य केले आहे. तसेच दिनांक ०९/०५/२०१२ रोजी त्यांच्यासमक्ष अपघातातील मोटारसायकलचा पंचनामा केल्याचे त्यांनी अमान्य केले आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या महत्वाच्या पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही.

**१६]** प्रकरणातील फिर्यादी तसेच तपासी अंमलदार अनिल गोडसे यांचा पुरावा साक्षीदार क्र.६ म्हणून नोंदविला आहे. साक्षीदाराच्या पुराव्यानुसार दिनांक २०/०४/२०१२ रोजी त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. अकस्मात मयताच्या तक्रारीवरुन सदरची फिर्याद घेतली. त्यांच्याकडे अकस्मात मयताची पी.एम अहवाल, इंक्वेस्ट पंचनामा, मयताचे कागदपत्रे, गंगा हॉस्पिटल व सिव्हिल हॉस्पिटल येथील कागदपत्रे प्राप्त झाली. त्यांनी मयताचा तपास सुरु केला. घटनास्थळ हे तुळजापूर-बार्शी रोडवर नागनाथ सातपुते

यांच्या शेतावरील रस्त्यावर होते. त्यांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा (निशाणी क्र.२२) केला. मयताच्या नातेवाईकांचे जबाब नोंदविले. ट्रॉली क्र. एमएच-१३-७२२९ या गाडीने रहदारीला अडथळा केल्यामुळे मोटारसायकलची धडक होवून अपघात झाला होता. त्यांनी दिनांक ०९/०५/२०१२ रोजी गाडीचा पंचनामा (निशाणी.क्र.२३) केला. अपघातातील ट्रॉली पाडुळे चालवित होता. त्याने रस्त्याची परिस्थिती लक्षात न घेता रहदारीला अडथळा होईल अशाप्रकार ट्रॅक्टर ट्रॉली उभी केली, त्यामुळे अपघात झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दिनांक ०९/०५/२०१२ रोजी त्यांनी फिर्याद (निशाणी.क्र.२४) दाखल केली.

**१७]** अभियोग पक्षाने अभिलेखावर तपासलेल्या साक्षीदार क्र.१, २, ४ व ५ यांच्या पुराव्यानुसार ते घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसून, त्यांनी अपघाताबाबतची माहिती ही त्यांना मिळालेल्या ऐकीव माहितीवरुन दिली आहे. परंतु साक्षीदार क्र. २ व ४ तसेच ५ हे घटना घडल्यानंतर त्यांना घटनेबाबतची माहिती मिळाल्यानंतर ते घटनास्थळी उपस्थित राहून अपघातातील जखमी नानासाहेब यांना दवाखान्यामध्ये उपचारासाठी दाखल केलेले आहे. त्यांच्या पुराव्यामधून घटनेच्यावेळी आरोपी घटनास्थळावर उपस्थित होता याबाबत काहीही आलेले नाही व आरोपीचे नाव त्यांना घटनेनंतर कळाल्याचे त्यांचे कथन आहे. प्रस्तुतच्या साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यामध्ये ट्रॉली रस्त्यावर वाहतुकीस उभी करुन अडचण निर्माण झाल्याने अपघात झाला. अशा परिस्थिमध्ये घटनास्थळावरील खरी परिस्थिती तसेच वाहनाची परिस्थिती व प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अपघातातील ट्रॅक्टर व ट्रॉली ही नेमकी कशा प्रकारे रस्त्यावर उभी होती व अपघात नेमक्या कोणाच्या चुकीमुळे झाला ह्या सर्व बाबी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्या संदर्भामध्ये घटनास्थळ पंचनामा निःसंशयरित्या सिध्द होणे गरजेचे आहे. तपासी अंमलदार यांच्या पुराव्यानुसार त्यांनी घटनास्थळाचा

पंचनामा पंचांसमक्ष केलेला आहे. परंतु घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार, साक्षीदार क्र.३ प्रदीप सातपुते यांच्या पुराव्यातून तो सिध्द झालेला नाही. घटनास्थळ पंचनामा (निशाणी.क्र.२२) चे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा पंचनामा हा दिनांक २१/०४/२०१२ रोजी नोंदविल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा अपघात हा दिनांक ०९/०४/२०१२ रोजी झालेला आहे व त्या संदर्भातील पंचनामा हा दिनांक २१/०४/२०१२ रोजी नोंदविल्याचे दिसून येत आहे. एवढेच नव्हेतर, दिनांक २१/०४/२०१२ रोजी रोडच्या डाव्या बाजूला उसाने भरलेली ट्रॅाली ही त्याठिकाणी लावलेली असल्याचे पंचनाम्यामध्ये नमूद आहे. प्रस्तुतचा घटनास्थळ पंचनामा प्रदीर्घ विलंबाने नोंदविलेला असल्याने घटनास्थळावरील घटनेच्या वेळची वाहनांची नेमकी खरी परिस्थिती पंचनाम्यामध्ये नमूद असणे अविश्वनीय आहे.

**१८]** प्रस्तुतचा अपघात हा नागनाथ सातपुते यांच्या शेताजवळ तसेच संभाजी महादेव ठोंगे यांच्या शेताजवळ झाल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या दोन्ही साक्षीदारांचा पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे होते. परंतु त्यांचा पुरावा अभिलेखावर नाही. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचा अवलोकन केले असता, प्रस्तुतची घटना ही दिनांक ०९/०४/२०१२ रोजी घडलेली असून त्याबाबतची फिर्याद ही दिनांक ०९/०५/२०१२ रोजी पोलीस नाईक गोडसे यांच्याव्दारे तपासाअंती दिल्याचे दिसून येत आहे. प्रकरणामध्ये तपासण्यात आलेले साक्षीदार हे मयताचे जवळचे नातेवाईक असून त्यांनी घटनेनंतर लगेचच फिर्याद दाखल केल्याचे दिसून येत नाही व प्रस्तुतची फिर्याद ही अपघात मयत क्र.०/१२ तसेच अपघात मयत क्र. २३/१२ अन्वये गंगा इन्स्टिटयुट ऑफ व न्यूरो सायन्स अॅड ट्रॅामा केअर, सोलापूर यांनी पोलीस स्टेशनला मेडीको लीगल केसच्या दिलेले सूचना प्रत्रक दिनांक १२/०४/२०१२ व्दारे तपास करण्याबाबत कळविल्यानंतर प्रस्तुतच्या

गुन्ह्याचा तपास सुरु झाल्याचे दिसून येत आहे. परंतु महत्वाची बाब म्हणजे, तपासी अंमलदार यांनी अभिलेखावर अपघात मयत नं.०/१२ तसेच अपघात मयत नं.२३/१२ याबाबतची कोणतीच कागदपत्रे दोषारोप पत्रासोबत दाखल केलेली नाही. प्रकरणामध्ये अपघाताची सूचना तसेच त्याबाबतीची फिर्याद मयताचे नातेवाईकांव्दारे पोलीस स्टेशनला दिल्याचे दिसून येत नाही, व अपघाताच्या पदीर्घ विलंबानंतर त्याबाबतची फिर्याद दाखल केल्याचे दिसून येत आहे.

**१९]** अभियोग पक्षाच्या कथनानुसार प्रस्तुतचा अपघात हा आरोपी याने ट्रॉली क्र. एमएच-१३-टी-७२२९ या गाडीने रहदारीला अडथळा केल्याने मयत नानासाहेब यांची मोटारसायकलची धडक ट्रॉलीला लागल्याने प्रस्तुतचा अपघात झालेला आहे. याउपर नमूद केलेल्या पुराव्यामध्ये अभिलेखावर तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी आरोपीने प्रस्तुतची ट्रॉली घटनास्थळी लावलेली होती याबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तपासण्यात आलेले संपूर्ण साक्षीदार हे ऐकीव माहितीवर साक्ष देत आहेत. आरोपीविरुध्दचा दोषारोप हा अपघाता संदर्भामध्ये असल्याने व प्रस्तुतचा अपघात हा आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॉली ही रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा परिस्थितीमध्ये लावल्याने प्रस्तुतचा अपघात घडल्याचे अभियोग पक्षाचे कथन आहे. त्या संदर्भामध्ये घटनास्थळ पंचनाम्याव्दारे घटनास्थळावरील ट्रॉलीची व मोटारसायलची परिस्थिती अभिलेखावर येणे गरजेचे होते. परंतु प्रस्तुतचा पंचनामा हा प्रदीर्घ विलंबाने नोंदविलेला असून पंचनाम्यावरील पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाकार्य केलेले नाही.

**२०]** अभिलेखावर दाखल शवविच्छेदन अहवाल, मरणोत्तर पंचनामा तसेच वैद्यकीय अहवाल याचे अवलोकन केले असता, अपघातामध्ये नानासाहेब

यांचा मृत्यू झाल्याचे दिसून येत आहे. परंतु सदरील मृत्यूस आरोपी कारणीभूत आहेत याबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपीविरुध्द प्रस्तुतचा दोषारोप सिध्द होण्यासाठी त्याने साक्षीदार हयांना नुकसान पोहोचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या मोटार सायकलला आगळीक केली ही बाब सिध्द करणे गरजेचे आहे. परंतु आरोपी हयांनी प्रस्तुतचे कृत्य म्हणजेच अपघात करण्याचा आरोपीचा उद्देश होता व त्याने अपघात केला ही बाब संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. सबब, आरोपीने त्या अनुषंगाने आगळीक करण्याचा प्रस्तुत दोषारोप सिध्द होत नाही. अभिलेखावर तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन कुठेही आरोपी हे घटना घडली तेव्हा घटनास्थळावर उपस्थिती होते याबाबत कोणताचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपीची घटनास्थळावरील उपस्थिती सिध्द झालेली नाही. अशा परिस्थितीमध्ये आरोपी घटनेची कोणतीही माहिती न देता पळून गेला असे म्हणता येणार नाही. आरोपीविरुध्दचा दोषारोप हा सबळ पुराव्यानिशी सिध्द न झाल्याने याठिकाणी आरोपी निर्दोष मुक्त करणे गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ४ ची उत्तरे नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करीता</u> :-**

**२१]** याकामी सादर केलेल्या एकंदरीत पूराव्यावरून आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन रहदारीस अडथळा निर्माण करुन व जिवीतास, मालमत्तेस नुकसान होईल अशा स्थितीमध्ये उभे केल्याने आरोपी मयताच्या मृत्यूस कारणीभूत ठरला हे सिध्द झालेले नाही. सहाजिकच आरोपीने गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष निःसंशयितरीत्या सिध्द करू शकलेला नाही असे म्हणणे भाग आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र राहिल. त्यामुळे आरोपीकडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रक्कम रू. १५,०००/- चा जामीन

घेण्यात आला. सबब, मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **कल्याण गोरख पाडुळे** याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३०४अ, २८३ व ४२७ आणि मोटार वाहन कायदयाचे कलम १३४/१७७ अन्वये च्या शिक्षापात्र गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रुपये १५,०००/- चे बंधपत्र दयावे.

४. या न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित व टंकलिखित करण्यात आला.)

PADMASHRI VASANT RAUT
Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2026.06.25 17:01:17 +0530

बार्शी.
दिनांकः २५/०६/२०२६

**(श्रीमती पी. व्ही. राऊत)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बार्शी.**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri. K. S. Naik<br>(Stenographer G-III) |
| (b) | Court | : | Smt. P.V. Raut,<br>2nd<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.,<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 25/06/2026 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 25/06/2026 |
| (e) | Judgment /Order reuploaded on | : | 25/06/2026 |